# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


तंशिप्र १२२३ /प्र.क्र ०६/एमसीए /**Edit Facility**/२०२३/५११ दिनांक : ०९/०३/२०२३

# जाहीर सूचना

**एमसीए सीईटी २०२३ या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता नोंदणी केलेल्या उमेदवारांना अर्जामध्ये सुधारणा करण्याची सुविधा (Edit Facility) उपलब्ध करुन देण्याबाबत...**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरीता सामाईक प्रवेश परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तंत्रशिक्षण विभागांतर्गत असलेल्या **एमसीए सीईटी २०२३** या सामाईक प्रवेश परीक्षेकरीता ज्या उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया परीक्षा शुल्क अदा करुन पुर्ण केलेली आहे. काही उमेदवारांकडून अर्ज भरताना अनावधनाने विविध प्रकारच्या चुका झालेल्या असून त्या दुरुस्त करण्याबाबत या कार्यालयाकडे दुरध्वनी, ईमेलद्वारे व प्रत्यक्ष कार्यालयात भेट देऊन विनंती करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उमेदवारांच्या शैक्षणिक हिताचा विचार करुन उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या अर्जात खालील नमूद माहिती मध्ये बदल करण्याबाबत संधी देण्यात येत आहे.

- उमेदवाराचे नाव
- जन्मतारीख
- छायाचित्र
- सही

उपरोक्त बदल करण्याचा कालावधी **दिनांक १२/०३/२०२३ ते १३/०३/२०२३** असून या कालावधीमध्ये उमेदवारांनी स्वत:च्या लॉगीनमधून अर्जामध्ये सुधारणा करावी.

**सही/-**

**आयुक्त तथा सक्षम प्राधिकरी**

**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**

**महाराष्ट्र राज्य, मुंबई**